महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/ससा/२०२०/ 1502 दिनांक :- 01/04/2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे विभागीय कार्यालयाचे अधिनस्त,
सर्व शासकीय/अशासकीय-अनुदानित/विना अनुदानित,
पदवी/पदव्यूत्तर पदवी आणि पदविका संस्था.

विषय :-मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोविड १९ या स्वतंत्र बँक खात्यात सढळ हस्ते मदत जमा करण्याबाबत.
संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१/तंशिसं/२०२०/३४ दि.३०/०३/२०२०

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्र पहावे. सुलभ संदर्भासाठी पत्राची प्रत जोडली आहे.

सध्या देशात कोविड १९ विषाणूमुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व प्रसंगी केंद्र शासन राज्य शासन काटेकोर उपाययोजना करीत आहे. या राष्ट्रीय आपत्तीचे प्रसंगी प्रशासनास सहकार्य करणे हे सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे. यासाठी वैद्यकीय सेवा,खानपान सेवा,स्वच्छता,पायाभूत सुविधा इ.आघाडीवर मोठया प्रमाणात मदत उपलब्ध होणे गरजेचे आहे. या उपाययोजनामध्ये स्वयंसेवी संस्था,उदयोजक,धार्मिक संस्था स्वयंप्रेरणेने सहभागी होवून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत करत आहे. केवळ याच प्रयोजनार्थ **मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोविड १९** हे स्वतंत्र बँक खाते स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडण्यात आले आहे.

राज्यातील नामवंत शैक्षणिक संस्था समूह महाविद्यालयीन शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या संघटना यांनी स्वयंप्रेरणेने एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे.

तरी संदर्भिय पत्रानुसार मा.संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांनी राज्यातील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित, विना अनुदानित पदवी/पदव्यूत्तर पदवी आणि पदविका संस्थांना जाहीर आवाहान केले की, त्यांनी आप आपल्या संस्थेतील शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधी त स्वेच्छेने जमा करावे.

त्यानुसार या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या सर्व संस्था प्रमुखांना आवाहान करण्यात येते की, त्यांनी आप आपल्या संस्थेतील शिक्षक/शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'स जमा करून सढळ हस्ते योगदान दयावे. रक्कम खाली नमुद केलेल्या खात्यात जमा करावी.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी- कोविड १९
बँकेचे बचत खाते क्रमांक - 39239591720
स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई ४०० ०२३
शाखा कोड 00300 आयएफएससी कोड SBIN0000300
सदर देणग्यांना आयकर अधिनियम १९६१ च्या ८० (ग) नुसार आयकर कपातीतून १०० टक्के सूट देण्यात येते.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग मुंबई ४०० ००१ यांना माहितीस्तव सादर.

C:\Users\ropune\Desktop\bhilave.docx

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग , पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९४०३,
ई-मेल – desk1@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १/तंशिसं/२०२०/३४
दिनांक : ३० / ०३ / २०२०

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,
राज्यातील सर्व शासकीय/ अशासकीय-अनुदानित/ विना-अनुदानित पदवी/पदव्यूतर पदवी आणि पदविका संस्था

विषय :- "मुख्यमंत्री सहाय्यता निधी -कोविड-19 " या स्वतंत्र बँक खात्यात सढळ हस्ते मदत जमा करण्याबाबत

महोदय,

सध्या देशात **'कोविड-19'** विषाणूमुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व प्रसंगी, नागरिकांचे जीव वाचविण्यासाठी आणि विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन काटेकोर उपाययोजना करत आहेत. या राष्ट्रीय आपतीचे प्रसंगी, प्रशासनास सहकार्य करणे हे सर्व नागरिकांचे कर्तव्य आहे. ज्या यंत्रणा या परिस्थितीचा देशवासीयांचे वतीने सामना करीत आहेत त्यांच्या प्रयत्नांना बळकटी देणे आवश्यक आहे. वैद्यकीय सेवा , खानपान सेवा, स्वच्छता , पायाभूत सुविधा इत्यादी आघाडीवर मोठ्या प्रमाणात मदत उपलब्ध होणे गरजेचे आहे. या उपाययोजनांमध्ये अनेक स्वयंसेवी संस्था, उद्योजक, धार्मिक संस्था स्वयंप्रेरणेने सहभागी होत आहेत, मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत करत आहेत . केवळ याच प्रयोजनार्थ **'मुख्यमंत्री सहाय्यता निधी- कोविड-19'** हे स्वतंत्र बँक खाते स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडण्यात आले आहे.

राज्यातील नामवंत शैक्षणिक संस्था समूह, महाविद्यालयीन शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संघटना यांनी स्वयंप्रेरणेने एक दिवसाचे वेतन 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी' स देण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ अनुदान आयोग यांनी देखील सर्व विद्यापीठे,

Scanned with CamScanner

शिक्षण संस्था आणि तेथील शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी यांना अश्या प्रकारचे आवाहन केले आहे. समाजाच्या विविध घटकांकडून स्वेच्छेने आणि उत्स्फूर्तपणे मिळणाऱ्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर, राज्याचा 'तंत्रशिक्षण संचालक' या नात्याने राज्यातील सर्व शासकीय/ अशासकीय -अनुदानित / विना-अनुदानित पदवी / पदव्यूत्तर पदवी आणि पदविका संस्थाना माझे जाहीर आवाहन आहे कि त्यांनी आप-आपल्या संस्थेतील शिक्षक / शिक्षकेतर अधिकारी / कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी' त स्वेच्छेने जमा करावे.

समाजाचा व राष्ट्राचा एक जबाबदार घटक या नात्याने आपण सर्वांनी एकत्र येऊन केवळ देशवासीयच नव्हे तर संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी या संकटाचा धैर्याने व एकजुटीने सामना करणे आपले कर्तव्य आहे असे मी व्यक्तिशः मानतो. व त्या अनुषंगाने सर्वतोपरी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे

**कृपया 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी' स सढळ हस्ते योगदान द्यावे असे मी पुनश्च आवाहन करीत आहे.**

खात्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे. --
मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड 19
बँकेचे बचत खाते क्रमांक- 39239591720
स्टेट बँक ऑफ इंडिया,
मुंबई मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई 400023
शाखा कोड 00300
आयएफएससी कोड SBIN0000300

सदर देणग्यांना आयकर अधिनियम 1961 च्या 80 (G) नुसार आयकर कपातीतून 100 टक्के सूट देण्यात येते

( डॉ अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, म. रा.

प्रत :- सर्व, विभागीय सहसंचालक ( तंत्रशिक्षण). त्यांनी आपल्या विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थांना याबाबत अवगत करावे.

Scanned with CamScanner